लोकमत

# 'शिवाजी विद्यापीठ रिसर्च फाऊंडेशन'च्या अध्यक्षपदी शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे. या कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. याच्या माध्यमातून नवनवीन उपक्रम, नवसंशोधनाला चालना मिळणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख आदी उपस्थित होते.

11 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलाचा विद्यापीठ घेणार अचूक वेध!

## शिवाजी विद्यापीठात राज्यातील पहिल्या हवामान बदल व शाश्वत विकास केंद्राची स्थापना

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

पश्चिम घाट व कोल्हापूर परिक्षेत्रात पंचगंगा, कृष्णा नदीला आलेला महापूर, भूस्खलनाचा वाढता धोका, शहरी भागातील ढगफुटी, तापमानवाढ व बदलते ऋतुमान या गोष्टींतून हवामान बदलाचा अनुभव घेत आहोत. याची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने हवामान बदल व शाश्वत विकास केंद्राची स्थापना केली आहे. महाराष्ट्रात हवामान बदलाचा अभ्यास करणारे हे पहिलेच केंद्र ठरले आहे. हवामान बदलांच्या परिणामावर उपाय शोधणे व निर्माण होणाऱ्या समस्यांचे आकलन व निर्मूलन करणे शक्य होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांसह विविध घटकांचे होणारे संभाव्य नुकसान टळणार आहे.

**पुढारी विशेष**

बदलते हवामान जगासमोरील प्रमुख पर्यावरणीय आव्हान बनले आहे. भारतात व इतरत्र भागात घडणाऱ्या आपत्तींना हवामान बदल कारणीभूत असून त्याची तीव्रता वाढत आहे. द फिजिकल सायन्स बेसिस-२०२१ या 'आयपीसीसी'च्या अहवालाने प्रथमच हवामान बदलावर प्रकाशझोत टाकला आहे. हवामान बदलाचा कोल्हापूर, सातारा, सांगली व पश्चिम घाट परिक्षेत्रातील शेती व जलसंपदा, जंगल व जैव विविधता, आरोग्य यावर होणाऱ्या परिणामांचे सखोल शास्त्रीय स्तरावर अध्ययन करण्यासाठीशिवाजीविद्यापीठातहवामानबदल व शाश्वत विकास केंद्राची (सेंटर फॉर क्लायमेट चेंज व सस्टेनेबिलिटी स्टडिज) स्थापना झाली आहे.केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठातील अनेक विभाग शाश्वत विकास व समाजासाठी एकत्र येऊन काम करणार आहेत. हवामान बदल, जंगले व कृषी यांच्यातील संबंध स्थापित करणे, नदीला पूर येण्याची कारणे तपासणे, मानवी आरोग्यावर प्रतिकूल घटनांचे परिणाम जाणणे, वनीकरण व कृषी कार्यक्रमांबाबतीत हवामान बदलाच्या समस्यांचे निराकरण करण्याचे मार्ग ओळखणे, शहरी विकासावर हवामान बदलाच्या परिणामांचा अभ्यास करून समाजातील वर्तणुकीत बदल घडवून आणणे आदी गोष्टी केल्या जाणार आहेत.

राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधकांना एकत्र आणून क्षेत्रीय स्तरावरील प्रश्न सोडवण्यासाठी त्यांची मदत घेतली जाणार असल्याची माहिती केंद्र समन्वयक प्रा. सचिन पन्हाळकर यांनी दिली.



> “ आज जगात हवामान बदल आणि त्याचे मानवी जीवनावर होणारे परिणाम हा सर्वात जास्त गंभीर विषय बनला आहे. या दृष्टीने हवामान बदलावर अभ्यास होणे आवश्यक आहे. विद्यापीठामध्ये यासंदर्भात विविध अभ्यासशाखा एकत्र येऊन या विषयावर संशोधन व उपाययोजना करण्याचे काम या केंद्रामार्फत होईल. केंद्रातर्फे व्याख्यानमाला, कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमदेखील राबवले जातील.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### केंद्रासाठी सहा संशोधकांची नियुक्ती

केंद्राच्या माध्यमातून प्रथमतः हवामान बदल, पश्चिम महाराष्ट्र पंचगंगा फ्लड मॉडेलिंग व जिओइन्फॉर्मेटिक्सचा वापर करून पश्चिम घाटातील भूस्खलन विश्लेषण या तीन विषयांवर संशोधन केले जाणार आहे. संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठ स्वतः अनुदान उपलब्ध करून देणार आहे. भविष्यात विविध संस्थांच्या माध्यमातून निधी उपलब्ध केला जाईल. संशोधन योग्य दिशेने व वेळेत पूर्ण होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञाची नेमणूक केली आहे. केंद्रासाठी सहा संशोधकांची नेमणूक केली आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी प्रवेश परीक्षा अर्ज उपलब्ध

**कोल्हापूर :** पदवीप्राप्त आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी यूजीसी नवी दिल्ली योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने मागवण्यात येत आहेत. अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आणि केंद्रांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. दि. २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासहित केंद्राच्या ई-मेलवर पाठवावेत तसेच केंद्रांच्या कार्यालयात जमा करावेत. प्रवेश परीक्षा दि. २७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे, अशी माहिती समन्वयक कांबळे यांनी दिली आहे.

सकाळ

# नदी प्रदूषणमुक्तीसाठी विद्यापीठाचा पुढाकार



## ग्रामपंचायतींना देणार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे मार्गदर्शन; आराखडा बनविण्याचे काम

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी आता शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. नदीकाठची गावे, शहराभोवतीच्या ग्रामपंचायतींना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी विद्यापीठ मदत करणार आहे. 'तंत्रज्ञान विभागातील एनव्हार्न्मेंट सायन्स अँड टेक्नॉलॉजी' विभागाकडे हा प्रकल्प सोपवला आहे.



कोल्हापूर महापालिका, इचलकरंजी नगरपालिका, औद्योगिक वसाहती आणि नदीकाठची गावे यांच्या सांडपाण्यामुळे नदी प्रदूषण होते. एकूण तयार होणाऱ्या ९६ एमएलडी सांडपाण्यापैकी ९३ एमएलडी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. इचलकरंजी नगरपालिकेनेही उपाययोजना सुरू केल्या आहेत.

**असे आहेत क्लस्टर**

| तालुका, | क्लस्टर | गावे |
|---|---|---|
| करवीर | १ | गांधीनगर, गडमुडशिंगी, वळीवडे |
| करवीर | २ | उचगाव (तावडे हॉटेल, वीटभट्टी) |
| करवीर | ३ | कळंबा, पाचगाव |
| हातकणंगले | ४ | चंदूर, कबनूर |
| हातकणंगले | ५ | तळसंदे |

मात्र, नदीकाठच्या गावांनी त्यांच्या सांडपाणी प्रक्रियेबाबत ठोस उपाययोजना केलेल्या नाहीत. नदी प्रदूषण रोखण्याचा जो सूक्ष्म आराखडा तयार केला. त्यात या ग्रामपंचायतींनी स्वतंत्र प्रक्रिया प्रकल्प उभे करावेत, असे सूचित केले आहे. शहराशेजारच्या ग्रामपंचायती आहेत, त्यांचे सांडपाणी रोखण्याची आवश्यकता आहे. हे सर्व सांडपाणी महापालिका हद्दीत येते. त्याचा अतिरिक्त भार महापालिकेवर पडतो. याची पहिला पायरी म्हणून या ग्रामपंचायतींचे पाच क्लस्टर केले आहेत. मात्र या गावांकडे प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे तंत्रज्ञान नाही. जिल्हा परिषदेने यासाठी निविदा काढली होती. यासाठी तीन प्रस्ताव आले होते.

पुराच्या काळात हे प्रक्रिया प्रकल्प बंद पडणारे होते. या शिवाय त्यांच्या व्यवस्थापनाचा खर्चही अधिक होता. त्यामुळे हे प्रस्ताव नामंजूर केले. अखेर शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील एनव्हार्न्मेंट सायन्स अँड टेक्नॉलजी विभागाला याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने दिला.

> **ग्रामपंचायतींचा सर्व डाटा अभ्यासणे सुरू आहे. एकूण तयार होणारे सांडपाणी, लोकसंख्या याबाबत माहिती घेतली आहे. पुढील महिन्याभरात याचा आराखडा बनवला जाईल.**
> **- प्रा. डॉ. श्रीकांत भोसले,**
> विभागप्रमुख-एनव्हार्न्मेंट सायन्स अँड टेक्नॉलॉजी.

तरुण भारत

# शासन आदेशानंतर महाविद्यालये सुरू

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोना कालावधीत गेल्या पावणेदोन वर्षापासून महाविद्यालये बंद होती. ही महाविद्यालये सोमवार ११ ऑक्टोंबरपासून सुरू होणार आहेत, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. परंतू राज्यातील विद्यापीठांना अद्याप शासन आदेश मिळालेला नाही. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात शासन आदेश प्राप्त झाल्यानंतरच महाविद्यालये सुरू होणार, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात कोणतीही अडचण नाही. विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालये, अधिविभागांची स्वच्छता, सॅनिटायझेशन झालेले आहे.

- शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती



अधिविभाग व महाविद्यालयात प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी दररोज येतात. त्यामुळे शासन आदेश प्राप्त झाल्यानंतर त्वरित महाविद्यालये सुरू होतील.

दोन शासकीय सुट्टी असल्याने सोमवारी शासन आदेश मिळण्याची शक्यता आहे. हा शासन आदेश शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळासमोर ठेवून मान्यता घेऊन महाविद्यालये व अधिविभाग सुरू करण्यात येतील. तसेच शासन आदेशातील कोरोना नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाणार आहे.

तरुण भारत

# दूरशिक्षणचे चार नवीन ऑनलाईन अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत नवीन शैक्षणिक वर्षापासून ऑनलाईन पद्धतीने चार नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. यामध्ये एमबीए, एमकॉम., एमएस्सी (गणित) आणि एमएस्सी (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. सरवदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाले आहे. त्यामुळे नवी दिल्ली येथील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्यावतीने दूरशिक्षण केंद्रातर्फे ऑनलाईन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे राज्य, देश, आणि विदेशातील विद्यार्थ्यांनाही दूरशिक्षणचे ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहेत. ऑनलाईन अभ्यासक्रम व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले आहेत.

तरूण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची प्रवेश परीक्षा २७ रोजी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये प्रवेश घेण्यासाठी २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास परवानगी आहे. तर २७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा होणार आहे. तरी पदवीप्राप्त व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे. नवी दिल्ली विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) च्या योजनेअंतर्गत एससी., एसटी, ओबीसी, ईडब्ल्यूएस (नॉनक्रिमिलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द आणि जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत प्रवेश दिले जातात. नवीन शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या **unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज उपलब्ध आहेत. तसेच ऑफलाईन अर्ज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. केंद्रांच्या कार्यालयात सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज जमा करावेत. प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने २७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत होणार आहे.